प्रकरण सहावे

# निष्कर्ष व शिफारशी

प्रकरण सहावे

# निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना

६.२ मूल्यांच्या संदर्भातील निष्कर्ष

६.३ समायोजन क्षमतेच्या संदर्भातील निष्कर्ष

६.४ शिफारशी

६.५ पुढिल संशोधनासाठी विषय

६.६ समारोप

## प्रकरण ६ वे

# निष्कर्ष व शिफारशी

### ६.१ प्रास्ताविक

प्रकरण क्र.५ मध्ये शिक्षक समायोजन शोधिका व मूल्य अध्ययन चाचणीद्वारे प्राप्त झालेल्या संशोधण सामग्रीचे विश्लेषण केले असून अन्वयार्थ लावलेला आहे. प्रस्तुत प्रकरण क्र. ६ मध्ये निष्कर्ष व शिफारशी सादर केलेल्या आहेत. तसेच पुढील संशोधनसाठी विषय निर्देशन केलेले आहे.

### ६.२ मूल्यांच्या संदर्भातील निष्कर्ष

माध्यमिक शाळेतील सर्व स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षक विद्याशाखा व शिक्षणशास्त्र पदवी व पदव्युतर शिक्षण घेतलेले आहेत.

सैध्दातिंक मूल्याच्या बाबतीत शे. २७.५ % शिक्षकांचे सैध्दांतिक मूल्य सर्वात जास्त आहे आणि ते ' फारच चांगुला ' या श्रेणीमध्ये येते तर १.२५ % शिक्षकांचे सैध्दांतिक मूल्य सर्वात कमी असून ते ' फारच कमी ' या श्रेणीमध्ये येते म्हणजेच माध्यमीक शिक्षकांचेकडे सैध्दांतिक मूल्य चांगले आहे.

अर्थिक मूल्याच्या बाबतीत शे. ३८.७५ % शिक्षकाकडे आर्थिक मुल्य ' सरासरी ' या श्रेणीचे आहे तर १.२५ % शिक्षकाकडे हे मूल्य कमी (अतिशय निकृष्ठश्रेणी) आहे म्हणजेच आर्थिक मूल्यांच्या बाबतीत माध्यमिक शिक्षक सरासरी श्रेणीमध्ये येतात.

सौंदर्यविषयक मूल्यांच्या बाबतीत ४३.७५ % शिक्षक ' सरासरी ' या श्रेणीचे आहेत. म्हणजेच माध्यमिक शिक्षकांकडे सौंद्रर्यात्मक दृष्टी बरी आहे.

सामाजिक मूल्यांच्या बाबतीत ४३.७५ % शिक्षक ' कमी ' या श्रेणीमध्ये येतात. यावरून माध्यमिक शिक्षकांचा समाजातील सहभाग कमी दिसून येतो.

राजकिय मूल्यांच्या बाबतीत ३८.७५ % शिक्षक कमी या श्रेणीमध्ये येतात. यावरून माध्यमिक शिक्षकांना राजकारणामध्ये फारशी आवड नसल्याचे दिसून येते.

माध्यमिक शिक्षकांच्या धार्मिक मूल्यांच्या बाबतीत ४३.७५ % शिक्षक सरासरी या श्रेणीमध्ये येतात. यावरुन माध्यमिक शिक्षकांच्याकडे धार्मिक मूल्य बऱ्यापैकी आहे.

माध्यमिक स्त्री आणि पुरुषांची मूल्यांच्या बाबतीत तुलना केली असता, पुरुष शिक्षकांच्यापेक्षा स्त्री शिक्षिकांमध्ये राजकीय, धार्मिक व सौंदर्यविषयक मूल्य जास्त असल्याचे आढळून आले. तर बाकीच्या तीन मूल्यांमध्ये समानता आढळून आली. यावरुन स्त्रिया ह्या पुरुषापेक्षा धार्मिक वृत्तीच्या, राजकारणात आवड असलेल्या, सौंदर्यात्मक दृष्टी असलेल्या आढळून आल्या.

## समायोजन क्षमतेच्या संदर्भातील निष्कर्ष

शे. ६१.२५ % शिक्षकांची शालेय व सर्वसामान्य वातावरण समायोजन क्षमता सरासरी या श्रेणीमध्ये येते. यावरुन या क्षेत्रातील त्यांची समायोजन क्षमता बरी आहे.

शे. ५१.२५ % शिक्षकांची सामाजिक, मानसिक, भौतिक क्षेत्रातली समायोजन क्षमता चांगली या श्रेणीमध्ये आहे.

व्यावसायिक संबंधाच्या बाबतीत शे. ५१.२५ % शिक्षकांची या क्षेत्रातील समायोजन क्षमता चांगली या श्रेणीमध्ये येते. म्हणजेच शिक्षकांचे या क्षेत्रामध्ये असणारे संबंध चांगले असल्याचे आढळून आले.

व्यक्तिगत जीवनामध्ये शे. ५२.५ % माध्यमिक शिक्षकांची समायोजन क्षमता चांगली आहे. आर्थिक व व्यावसायिक समाधान क्षेत्रातील ५६.२५ % शिक्षकांची समायोजन क्षमता चांगली आहे.

एकंदरीत माध्यमिक शिक्षकांची सर्वच क्षेत्रातील समायोजन क्षमता चांगली आहे. यावरुन माध्यमिक शिक्षक सुसमायोजित शिक्षक आहे असा निष्कर्ष निघतो.

माध्यमिक स्त्री व पुरुष शिक्षकांची समायोजन क्षमतेच्या संदर्भात तुलना केली असता, पुरुष शिक्षकांच्यापेक्षा स्त्री शिक्षिकांची सामाजिक, मानसिक, भौतिक क्षेत्रातील, व्यक्तिगत जीवनातील समायोजन क्षमता व आर्थिक व व्यावसायिक समाधान क्षेत्रातील समायोजन क्षमता चांगली आहे. तर शालेय व सर्व सामान्य वातावरण क्षेत्रातील व व्यावसायिक संबंध समायोजन क्षेत्रातील समायोजन क्षमता पुरुष शिक्षकांच्या सारखीच म्हणजे सरासरी आहे.

## ६.४ शिफारशी

मूल्ये आणि समायोजन क्षमता यांचा अभ्यास खालील बाबतीत केला जावा.

प्राथमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक, महाविद्यालयीन शिक्षक यांच्या मूल्य आणि समायोजन क्षमतेचा अभ्यास केला जावा.

प्राथमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन स्त्री शिक्षक आणि पुरूष शिक्षकांच्या मूल्यांचा व समायोजन क्षमतांचा तूलनात्मक अभ्यास केला जावा.

मुख्याध्यापक आणि प्राचार्य यांच्या मूल्ये व समायोजन क्षमता यांचा अभ्यास केला जावा.

शैक्षणिक संस्थामधील व्यवस्थापन क्षेत्रातील संस्थाचालक सदस्य यांची मूल्ये व समायोजन क्षमतांचा अभ्यास केला जावा.

व्यावसायिक क्षेत्रातील उदा. डॉक्टर, इंजिनियर यांची मूल्ये, समायोजन क्षमतांचा अभ्यास केला जावा.

सरकारी, निमसरकारी, खाजगी कर्मचाऱ्यांच्या मूल्यांचा अभ्यास केला जावा.

लोकशाही प्रणालीतून निवड झालेले उदा. आमदार, जि. प. सदस्य, पंचायत समिती सदस्य यांच्या मूल्यांचा अभ्यास केला जावा.

**मूल्य वाढीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करावे.**

विविध तज्ञांचे मार्गदर्शन, चर्चासत्रे, कृतीसत्रे, शिबीरे आयोजित करावीत.

शाळा व सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने काही उपक्रम आयोजित करावे. उदा. रक्तदान शिबीरे, आरोग्यविषयक शिबीरे, व्यवसाय मार्गदर्शन अंधश्रध्दा निर्मूलन विषयक उपक्रम अपंगासाठी मदत केंद्रे इ. शिक्षकांसाठी व्यक्तिमत्व विकास शिबीरे आयोजित करावीत.

शिक्षकांचे व्यक्तिमत्व मापन मानसशास्त्रीय चाचणीद्वारे करुन घ्यावे.

### ६.५ पुढील संशोधनासाठी विषय निर्देशन :

प्राथमिक शिक्षकांच्या मूल्य आणि समायोजन क्षमतेचा अभ्यास.

उच्च माध्यमिक शिक्षकांच्या मूल्य आणि समायोजन क्षमतेचा अभ्यास.

शिक्षक अभिरुची आणि समायोजन क्षमता यांचा अभ्यास.

मुख्याध्यापक व प्राचार्य यांची मूल्ये व समायोजन क्षमता यांचा अभ्यास.

### ६.६ समारोप

या प्रकरणामध्ये प्रश्नावली भरुन घेतलेल्या प्रतिसादावरुन लावलेल्या अन्वयार्थाच्या आधारे निष्कर्ष काढलेले आहेत व त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत. त्याप्रमाणे पुढे परिशिष्टे दिलेली आहेत.